नि.फौ.ख.क्रं.४६/२०२०
सरकार वि. योगीराज व इतर.
**नि.क्रं.३४.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | संतोष गणेश चव्हान, |
| वय सुमारे | : | ३८ वर्षे,व्यवसाय: पोलीस हवालदार, ब.नं.९९२, पोलीस ठाणे, लाखांदूर, |
| निवासस्थान | : | लाखांदूर, |
| तालुका | : | लाखांदूर, जिल्हा: भंडारा. |

**सरतपास – सहा. सरकारी वकील श्री. पी. एस. बुटले साहेब यांचेमार्फत–**

१. दिनांक ११.१२.२०१९ रोजी मी पोलीस ठाणे, पवनी येथे पोलीस नायक या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी मला गुन्हा क्रमांक ३५०/२०१९ कलम ३७९, १८६ भादवी चा तपास देण्यात आला होता. तपासकामी मला छापील प्रथम खबर अहवाल व तोंडी तक्रार मिळाली होती. त्यानंतर मी घटनास्थळी जावुन दोन पंचांसमक्ष फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ हे मौजा पवनी ते निलज रोडवर वाही गेस्ट हॉऊससमोर येथे आहे. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्रं.३५** देण्यात येते. त्यानंतर मी घटनास्थळावरून पंचांसमक्ष एक टिप्पर योगीराज देशमुख यांच्याकडुन जप्त केला. त्याचा क्रमांक एम.एच.४० ए.के.५९१९ असा होता. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यास **निशानी ३६** देण्यात येते. त्यानंतर साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. त्यानंतर कलम वाढीबाबत न्यायालयास पत्र दिले होते. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्या पत्रास निशानी ३७ देण्यात येते. तपासाअंती मला आरोपीविरूध्द पुरावा मिळुन आल्याने मी त्याच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दोषारोपपत्रातील आरोपींचे छायाचित्र दाखविले. ते मी ओळखतो.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपीतर्फे वकील श्री. एस. डब्ल्यु. कावळे यांच्यामार्फत.**

२. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील जप्तीची कारवाई ही तहसिल कार्यालयातील कर्मचा–यांनी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी तहसिल कार्यालयाची पवनी निलज रोडवर चौकी होती व ते प्रत्येक टिपरची चौकशी करत असत. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी

आरोपींची खाली गाडी ही बराच वेळी तहसिल कर्मचा–यांनी अडवुन धरल्याने योगीराज देशमुख हे ती गाडी घेवुन निघुन गेले. हे म्हणणे खरे नाही की, योगीराज देशमुख हे गाडी घेवुन गेल्याने तहसिल कर्मचा–यांनी रागाच्या भरात पोलीस ठाण्याला येवुन तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळी न जाता पोलीस ठाण्यातच पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी न जाता जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ तहसिल कर्मचा–याचे बयान नोंदविले होते इतर त्रयस्थ लोकांचे बयान नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांच्या सांगण्याप्रमाणे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**<u>फेरतपास – काही नाही</u>**.

| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
|---|---|
| स्वा/– | स्वा/– |
| (एस. एन. पाटील) | (एस. एन. पाटील) |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. |
| २८/०२/२०२४ | २८/०२/२०२४ |